**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.०५)**

**शुक्रवार दिनांक १० जुलै २०२६**

**ठळक बातम्या....**

1. **महात्मा फुले शेतकरी कर्जमाफी योजनेत मिळणारी पन्नास हजार रुपयांची रक्कम आता दोन लाखांपर्यंत करण्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा**
2. **विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन संस्थगित, हिवाळी अधिवेशन ७ डिसेंबर पासून नागपुरात होणार**
3. **जातपडताळणी प्रक्रियेत सुधारणा करणारे महाराष्ट्र SC, ST, VJ, NT, OBC, SBC सुधारणा विधेयक आज विधान परिषदेत मंजूर**
4. **नागपूरसह विदर्भात पावसाची उघडीप, उकाड्यात वाढ**

---

**अधिवेशनाचा समारोप**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महात्मा फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत प्रोत्साहनपर लाभाची मर्यादा ५० हजार रुपयांवरून २ लाख रुपयांपर्यंत वाढविण्याची घोषणा आज विधानसभेत केली. तसेच २०२५ पर्यंतची कर्जमाफीची अट रद्द करण्यात आल्याने अधिकाधिक शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले त्यानंतर विधानमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाचा समारोप झाला. विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी पावसाळी अधिवेशन संस्थगित झाल्याची घोषणा करत हिवाळी अधिवेशन ७ डिसेंबरपासून नागपुरात होणार असल्याचे जाहीर केले. या अधिवेशनात विधान परिषदेत २७ विधेयके मंजूर झाली असून एक विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यात आले. अधिवेशनात एकूण १०१ तास १० मिनिटे कामकाज झाले, सदस्यांची सरासरी उपस्थिती ७८ टक्के राहिली, तर मंत्र्यांच्या अनुपस्थितीमुळे ३५ मिनिटे कामकाज वाया गेल्याची माहिती त्यांनी दिली.तसेच विधानसभेचे कामकाजही संस्थगित करण्यात आले.

यावेळी विधान परिषदेतील सतीश चव्हाण, अरुण लाड, अभिजित वंजारी, किरण सरनाईक आणि जयंत आजगावकर या सदस्यांना निरोप देण्यात आला. या सदस्यांची मुदत ६ डिसेंबर २०२६ रोजी संपुष्टात येणार आहे.

---

**विधी मंडळ**

***(व्हॉइस कास्ट - संस्कृति भेलोंडे )***

*राज्यात जिल्हा परिषदेच्या शाळांमधल्या शिक्षकांची बदली प्रक्रिया शाळा सुरू होण्यापूर्वी पूर्ण व्हावी, या दृष्टीने शासन नियमावली तयार करेल, असं आश्वासन मंत्री जयकुमार गोरे यांनी विधानसभेत एका लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात दिलं. महात्मा फुले जन आरोग्य योजनेमध्ये आता प्राथमिक स्तरावरच्या पेट स्कॅनचा समावेश देखील करण्यात येणार असून कर्करोगावर उपचार करण्यासाठी अधिकची रक्कम या योजनेमध्ये दिली जाईल अशी माहिती आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली. याबाबतची लक्षवेधी सूचना प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित केली होती, त्यावर मनीषा चौधरी यांनी उपप्रश्न विचारला. ग्रामीण भागात या योजनेचा फायदा मिळावा यासाठी रुग्णालयांच्या निकषांमध्ये बदल करण्यात येतील अशी माहिती देखील मंत्र्यांनी यांनी यावेळी दिली.जल जीवन मिशनच्या अंतर्गत विविध कामांचे १८ हजार सुधारित प्रस्ताव सरकारला प्राप्त झाले आहेत. त्यांना लवकरात लवकर मंजुरी देऊ आणि आवश्यक निधी देऊ असं राज्यमंत्री मेघना बोर्डीकर साकोरे यांनी प्रश्नोत्तराच्या तासात विधान परिषदेत सांगितलं. अनेक गावामध्ये पाहणी करताना काही वाड्या वस्त्या वगळल्यामुळे सुधारित प्रस्ताव मागवले होते. यापूर्वी ११ हजार प्रस्ताव मंजूर झाले आहेत, अशी माहिती त्यांनी दिली. 'गाव तिथे उद्योजक' ही योजना राज्य सरकार तयार करणार आहे अशी घोषणा उद्योग मंत्री उदय सामंत यांनी आज विधान परिषदेत केली. याशिवाय सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योजकांच्या समस्या सोडवण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याचा दौरा करून जनता दरबार पद्धतीने त्यांच्या अडचणी सोडवणार असल्याची घोषणा त्यांनी केली.*

*(आकाशवाणीसाठी वृत्तविभागातून मी संस्कृति भेलोंडे)*

---------------------------------------------------

**जातपडताळणी**

महाराष्ट्रातील जातपडताळणी प्रक्रियेत सुधारणा करणारे SC, ST, VJ, NT, OBC आणि SBC सुधारणा विधेयक आज विधान परिषदेत मंजूर झाले. खोट्या जात प्रमाणपत्राच्या आधारे नोकरी, शिक्षण किंवा निवडणुकीत लाभ घेतल्याचे सिद्ध झाल्यास संबंधित लाभ रद्द करून वसुली केली जाणार आहे. अशा प्रकरणांत सहा महिने ते दोन वर्षांपर्यंत सश्रम कारावास आणि दोन हजार ते वीस हजार रुपयांपर्यंत दंडाची तरतूद करण्यात आली आहे. पडताळणी समितीच्या निर्णयाविरोधात अपील प्राधिकरणाची व्यवस्था असून त्याच्या निर्णयाला थेट उच्च न्यायालयात आव्हान देता येणार आहे.

---------------------------------------------------

**विधान सभा**

गडचिरोली जिल्ह्यातील बंगाली समाजातील व्यक्तींना पुनर्वसन कायद्यांतर्गत मिळालेल्या जमिनींचा वर्षानुवर्षे प्रलंबित असलेला प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. या बांधवांना मिळालेल्या जमिनी भोगवटादार वर्ग-२ मधून वर्ग-१ (पूर्ण मालकी हक्क) करण्याचा अत्यंत महत्त्वाचा आणि ऐतिहासिक निर्णय महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला आहे. विधानभवनात आयोजित एका उच्चस्तरीय बैठकीत महसूलमंत्र्यांनी यासंबंधीचे महत्त्वपूर्ण निर्देश दिले.अमरावती महानगरपालिकेच्या कचरा उचल निविदा प्रक्रियेतील कथित अनियमिततेच्या विभागीय आयुक्तांच्या स्तरावर सखोल चौकशी करण्यात येईल. चौकशीत गैरप्रकार आढळल्यास संबंधितांवर 90 दिवसांच्या आत कारवाई केली जाईल, अशी माहिती मंत्री उदय सामंत यांनी विधानपरिषदेत दिली.

---------------------------------------------------

**ब्रिक्स बैठक**

भारताच्या 2026 च्या ब्रिक्स अध्यक्षतेखाली ब्रिक्स सदस्य देशांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना एकत्र आणणारी तिसरी ब्रिक्स वाहतूक कार्यगट बैठक काल नागपूर येथे सुरू झाली. पुढील दोन दिवसांतील चर्चेमुळे ब्रिक्स देशांमधील भागीदारी आणि परस्परांकडून शिकण्याची भावना अधिक दृढ होणार असुन या कार्यगटाच्या बैठकीनंतर उद्या 11 जुलै शनिवार रोजी केंद्रिय परिवहन मंत्री नितीन गडकरी यांच्या प्रमुख उपस्थितीत नागपूर येथेच ब्रिक्स वाहतूक मंत्र्यांची तिसरी बैठक होणार आहे.

---------------------------------------------------

**अतिरिक्त गाड्या**

प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वेने छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-नागपूर आणि नागपूर-नाशिक रोड मार्गावर दोन जोड्या अनारक्षित विशेष रेल्वेगाड्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे. सीएसएमटी-नागपूर विशेष गाडी ११ जुलै रोजी, तर नागपूर-सीएसएमटी विशेष गाडी १२ जुलै रोजी धावणार आहे. तसेच नागपूर-नाशिक रोड विशेष गाडी १२ जुलै आणि नाशिक रोड-नागपूर विशेष गाडी १३ जुलै रोजी चालवण्यात येईल. या सर्व गाड्या पूर्णपणे अनारक्षित असून प्रत्येकी १६ सामान्य द्वितीय श्रेणी आणि २ एसएलआर अशा एकूण १८ डब्यांसह धावतील. प्रवाशांनी या विशेष सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन मध्य रेल्वेने केले आहे.

---------------------------------------------------

**यवतमाळ प्रथम क्रमांक**

रस्ते अपघातांमध्ये २१ टक्क्यांची घट नोंदवत यवतमाळ जिल्ह्याने राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. जानेवारी ते जून २०२६ या कालावधीत यवतमाळ पोलिसांनी

केलेल्या नियोजनबद्ध उपाययोजनांमुळे अपघातांमध्ये १००, मृत्यूंमध्ये ५३ तर जखमींच्या संख्येत ९७ ने घट झाली आहे. पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात आलेल्या कठोर कारवाई आणि जनजागृती मोहिमांमुळे हे यश मिळाल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

---------------------------------------------------

**महात्मा बसवेश्वर व्याख्यानमाला**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात कै. दादा मनोहरराव कल्लावार स्मृतिप्रीत्यर्थ महात्मा बसवेश्वर व्याख्यानमाला १३ जुलै रोजी दुपारी ४ वाजता दीक्षांत सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. 'लोकशाही प्रस्थापनेत महात्मा बसवेश्वरांचे योगदान' या विषयावर संत साहित्याचे अभ्यासक पंकज वंजारे व्याख्यान देणार आहे.

---------------------------------------------------

**आढावा**

आरोग्य सेवा आयुक्त तथा राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे अभियान संचालक संजय काटकर यांनी भंडारा जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र भुयार येथे भेट देऊन आरोग्य सेवांचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी आशा स्वयंसेविका, जन आरोग्य समितीचे पदाधिकारी व आरोग्य कर्मचाऱ्यांशी संवाद साधून कामकाजातील अडचणी जाणून घेतल्या. आरोग्य सेवांमध्ये डिजिटल प्रणालीचा अधिक वापर, पेपरवर्क कमी करणे आणि माता-बाल आरोग्य, लसीकरण व जनजागृती अधिक प्रभावी करण्यावर त्यांनी भर दिला.

---------------------------------------------------

**भाडेपट्टा करार**

वाशीम जिल्ह्यातील रिसोड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य आवारातील ११ भूखंडांचे भाडेपट्टा करार शासनाने रद्द केले आहेत. पुणे पणन संचालनालयाने ११ जूनच्या आदेशानुसार वादग्रस्त विकास आराखड्याचा ठरावही रद्द केला आहे. आमदार डॉ. आशिष देशमुख यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नानंतर झालेल्या चौकशीत नियमभंग आढळल्याने ही कारवाई करण्यात आली असून, पुढील प्रशासकीय कारवाईची शक्यता व्यक्त केली जात आहे.

---------------------------------------------------

**हवामान**

विदर्भाच्या सर्व जिल्ह्यांमध्ये आज आणि उद्या पावसानं उघडी दिली असून उकाड्यात वाढ झाली आहे. नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार आज

आणि उद्या तसंच परवा देखील विदर्भाच्या बहुतांश जिल्ह्यांमध्ये हवामान सामान्य राहणार असून पावसाची शक्यता वर्तवण्यात आलेली नाही.

---------------------------------------------------

**हॉकी**

जपानमध्ये होणाऱ्या २० व्या आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी २० सदस्यांच्या भारतीय महिला हॉकी संघाची घोषणा करण्यात आली. कर्णधार पदाची धुरा पुन्हा एकदा सलीमा टेटे हिच्याकडे दिल्याचं संघाचे मुख्य प्रशिक्षक सजॉर्ड मारिनज यांनी सांगितलं. ही स्पर्धा १९ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर या कालावधी जपानच्या ऐची आणि नागोया या शहरांमध्ये होणार आहेत.

---------------------------------------------------

**फिफा**

फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धेच्या काल झालेल्या पहिल्या उपांत्यपूर्व सामन्यात फ्रान्स ने मोरोक्को संघाचा 2-0 असा पराभव केला. उपांत्यपूर्व फेरीच्या दुसऱ्या सामन्यात स्पेन आणि बेल्जियम, तिसऱ्या सामन्यात नॉर्वे विरुद्ध इंग्लंड आणि चौथ्या सामन्यात अर्जेंटीना विरुद्ध स्वित्झर्लंड अशा लढती होणार आहेत.

---------------------------------------------------

**बालजगत**

दीनदयाल शोध संस्थानच्या दीनदयाल पुस्तक पेढीतर्फे नागपूरातील ३० ते ३५ शाळांतील आर्थिकदृष्ट्या गरजू विद्यार्थ्यांना पुस्तके आणि  वह्यांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमात ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. बाबासाहेब नंदनपवार यांनी विद्यार्थ्यांनी समाजहिताचे ध्येय ठेवून कार्य करण्याचा निर्धार करावा, असे आवाहन केले.

---------------------------------------------------